अ. भि. शहा : अनुवादक मे. पुं. रेगे

इस्लाम आणि मानवतावाद

"इस्लामची विचारपद्धती अधिकारवादी (authoritarian) आहे. (खलिफाची) राजसत्ता निरंकुश असावी हा सिद्धांत, ईश्वराचे त्याने निर्मिलेल्या जीवांशी असलेले नाते निरंकुश सत्तेचे असते ह्या धार्मिक सिद्धांताशी समान्तर आहे." [१]

मानवतावाद हे माणसाविषयीचे एक दर्शन आहे आणि ती एक जीवनपद्धती आहे. "माणूस विश्वात स्वतःच्या मदारीवर उभा आहे आणि इहलोकातील त्याचे दृश्य जीवन हे त्याचे सबंध जीवन आहे ह्या गृहीतकृत्यापासून तो निष्पन्न होतो. तसेच स्वतःच्या जीवनाविषयीची आणि मानवजातीच्या जीवनाविषयीची जबाबदारी पत्करणे हाही मानवतावादाचा अंगभूत घटक आहे. मानवी परिस्थितीविषयीचे हे निदान आणि पत्करलेली ही जबाबदारी वैयक्तिक निर्णयांवर आधारलेली असते आणि हे दोन निर्णय म्हणजे मानवतावाद. ह्याच्याहून कमी भरेल त्याला मानवतावाद म्हणता येणार नाही." [२] म्हणून मानवतावाद "मानवी हित आणि मानवी मन ह्यांचे सर्वोच्च स्थान मान्य करतो आणि दैवी, निसर्गातीत अस्तित्वाचा अव्हेर करतो (चेंबर्स डिक्शनरी). तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र आणि व्यावहारिक कृती ह्यांच्या दृष्टीने मानवतावादी भूमिकेचा आशय काय आहे हे ह्या व्याख्यांनी पुरेशा नेमकेपणे स्पष्ट झाले आहे. मानवतावादी भूमिकेपासून निष्पन्न होणारा एक परिणाम असा की मानवतावादी कोणत्याही स्वरूपाच्या अधिकारशाहीला-मग ती धार्मिक असो किंवा ऐहिक असो—पाठिंबा देऊ शकत नाही. मानवतावादी लोकशाहीवादी असावा लागतो. माणसांना शिक्षण देऊन सुधारता येते असा त्याचा विश्वास असतो. तसेच, तो जरी धार्मिक प्रवृत्तीचा असला तरीं 'मानवी बुद्धिमत्तेच्या अंगी संस्थात्मक आणि नैतिक सुधारणा घडवून आणण्याची शक्ती असते' [३] असा त्याचा विश्वास असतो. आजच्या श्रद्धाळू लोकांना ह्याचे आश्चर्य वाटायचे कारण नाही. पंधराव्या शतकात ख्रिश्चन मानवतावाद्यांनी जो कार्यक्रम स्वीकारला होता त्याची भिस्त माणसाच्या अंगची विवेकशक्ती अतिशय महत्वाची आहे ह्या दृढ धारणेवर होती... त्याचा भर ईश्वरी प्रसादापेक्षा मानवी प्रकृतीवर होता; धर्मशास्त्रापेक्षा नीतीचे, चिंतनापेक्षा कृतीचे महत्व त्याला अधिक होते.' [४] ह्यामुळे मानवतावादी हा समाजाचा चिकित्सक परीक्षक असतो आणि 'हे जीवन म्हणजेच सर्व काही आहे' असे तो मानीत असल्यामुळे त्याला त्याच्या भौतिक आणि आध्यात्मिक संपन्नतेत आपल्या परीने जी काही भर घालता येणे शक्य असेल ती घालण्याची जबाबदारी तो स्वीकारतो. त्याची जर ईश्वरावर श्रद्धा असेल तर माणसाच्या सेवेतच ईश्वराची सेवा सामावलेली असते असे तो मानतो.

---

१. जी. ई. फॉन ग्युनेबॉम, इस्लाम : एसेज इन् धि नेचर अँड ग्रोथ ऑफ ए कल्चरल ट्रॅडिशन (दुसरी आवृत्ती, पुनर्मुद्रित), रुटलेज अँड केगन पॉल, लंडन, १९६४, पृ. १३५.

२. एच्. जे. ब्लॅक्हॅम, ह्युमनिझम, पेन्गिवन बुक्स, लंडन १९६८, पृ. १३

३. मायरन पी. गिलमोर, धि वर्ल्ड ऑफ ह्युमनिझम (१४५३–१५१७), हार्पर अँड ब्रदर्स, न्यू यॉर्क १ २, पृ. २०४.

४. कित्ता, पृ. २०४–२०५

अनुक्रमणिका

जगाविषयीचा हा मानवतावादी दृष्टिकोन आनुभविक, वैज्ञानिक ज्ञानावर आधारलेला आहे. परीक्षण न करता कित्येक सिद्धांतांशी चिकटून राहण्याच्या वृत्तीशी तो पूर्णपणे विसंगत आहे. मानवतावादी दृष्टीने नीतिशास्त्राचा संबंध कित्येक मूलभूत मानवी प्रेरणांशी पोचतो. व्यक्तीव्यक्तीमधील संबंधांचे नियमन करणाऱ्या दंडकांची (norms) व्यवस्था म्हणजे नीती ह्या दृष्टीने तो नीतीकडे पहातो. म्हणून त्याला अभिप्रेत असलेली नीती विवेकाधिष्ठित, ऐहिक व सापेक्ष असते. पण ह्यामुळे नीतीच्या सार्वत्रिक प्रामाण्याला बाधा येत नाही. ही नीती ऐहिक असल्यामुळे, ऐहिक यशाची किंमत, जर हे यश योग्य, ऋजू मार्गाने प्राप्त करून घेतलेले असेल तर, ती कमी लेखीत नाही. ती विवेकाधिष्ठित असल्यामुळे, साध्ये आणि साधने ह्यांच्यांत उचित असा संबंध जुळवून आणणे आवश्यक असते, हे ती मान्य करते. तसेच आपल्या वेगवेगळ्या साध्यांमध्ये, आणि आपली साध्ये व इतरांची साध्ये ह्यांच्यामध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे हेही ती मान्य करते. परंतु हा समन्वय एखाद्या तत्त्वमीमांसक तत्त्वाला किंवा ईश्वरी आदेशाला अनुसरून न करता ज्ञानाच्या साहाय्याने, माणसाच्या आपल्या इतिहासजन्य परिस्थितीशी क्रियाप्रतिक्रिया चाललेल्या असतात ही जाणीव बाळगून साधला पाहिजे असे ती मानते.

मानवतावादी नीतीचे जे स्वरूप आहे त्याचा आधुनिक ज्ञानाशी साक्षात् संबंध आहे. वस्तूंविषयीचे आपले जे ज्ञान असते त्याची घडण कशी असते हे आधुनिक विज्ञानाने स्पष्ट केले आहे. आणि अभ्युपगमांचे (hypothesis) परीक्षण करण्याचे आनुभविक निकष त्याने विकसित केले आहेत. ह्यामुळे माणूस आणि निसर्ग ह्यांविषयीच्या सर्वच उपपत्तींच्या ठिकाणी अंगभूत अशी अनिश्चितता असते ही गोष्ट उघड झाली आहे. हे उघड करण्याचे श्रेय आधुनिक विज्ञानाला आहे. अगदी दृढपणे प्रस्थापित झालेली उपपत्तीही भावी अनुभवांमुळे खोटी पाडली जाणे शक्य असते किंवा अधिक सामान्य आणि व्यापक अशा उपपत्तीमध्ये सामावून घेतली जाणे शक्य असते हे वैज्ञानिक जाणतो. पण अशा रीतीने उपपत्ती जरी बदलत गेल्या तरी वैज्ञानिक पद्धतीला अनुसरून जे ज्ञान प्राप्त करून घेतलेले असते आणि ज्याचे प्रामाण्य सिद्ध करण्यात आलेले असते त्याच्या ठिकाणी एक विशिष्ट गुण अनिवार्यपणे असेल अशी हमी वैज्ञानिक पद्धतीकडून लाभते. हा गुण असा की अशा ज्ञानाच्या अंगी स्वतःला अधिकाधिक दुरुस्त करीत नेण्याची क्षमता आणि प्रवृत्ती ह्या ज्ञानाच्या अंगी असते. ह्याचा एक महत्त्वाचा परिणाम असा झाला आहे की आधुनिक दृष्टिकोनातून पाहता अन्वेषणाचे (inquiry) फलित म्हणून जे ज्ञान आपल्याला लाभते त्याला जितके महत्व असते तितकेच अन्वेषणपद्धतीलाही महत्व असते. हा आधुनिक दृष्टिकोन केवल किंवा अंतिम सत्याची सर्व भाषा आणि तिच्याशी निगडित असलेली असहिष्णू वृत्ती वर्ज्य मानतो. कित्येक सिद्धांत परीक्षण न करता स्वीकारले पाहिजेत आणि कोणत्याही परिस्थितीत त्यांना दृढपणे चिकटून राहिले पाहिजे ह्या वृत्तीला तो समूळ फाटा देतो. सत्य काय आहे आणि योग्य काय आहे हे समाजात अधिकृतपणे म्हणून प्रसृत करू पाहणारी जी स्थाने आणि संस्था समाजात असतात त्यांना आळा घालण्यासाठी, त्यांच्याकडून लाभणारे आदेश दुरुस्त करण्यासाठी आणि तसेच मानवी निर्मितिशीलता मोकळेपणे बहरू देण्यासाठी तो चिकित्सक परीक्षणाच्या वृत्तीला उत्तेजन देतो. आधुनिक ज्ञानाने आणि ह्या ज्ञानापासून जन्माला आलेल्या नवीन नीतीने जी बौद्धिक चौकट उपलब्ध करून दिली आहे तिच्यामुळे मानवी प्रेरणांशी, आणि शिक्षणाच्या प्रसाराने आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासाने मोकळ्या झालेल्या उत्पादक शक्तींशी, अधिक चांगल्या प्रकारे जुळणाऱ्या नवीन संस्थांचा उदय होण्याला साहाय्य झाले आहे. ह्याहीपेक्षा अधिक महत्वाची गोष्ट अशी की सतत बदलत असणाऱ्या परिसराशी गतिशील असा समतोल साधीत जगण्यासाठी आवश्यक असलेली मानसिक तयारी ही बौद्धिक चौकट करून घेते. पूर्वी माणसे संस्थांद्वारा किंवा विचार करण्याच्या आणि वर्तनाच्या रूढ सवयींमध्ये स्थैर्य शोधीत; त्याऐवजी मूल्यांची सुसंगत व्यवस्था लावणाऱ्या एका विशिष्ट दृष्टिकोनात ते हे स्थैर्य शोधायला शिकतात. मानवी परिस्थितीत हे जे आमूलाग्र परिवर्तन झाले आहे त्याचे मानवतावादी

अनुक्रमणिका

स्वागत करतो. त्याच्यात एक आव्हान आहे; पण मानवी प्रकृतीत गर्भित असलेली जी अस्तित्वाची पातळी आहे ती पूर्णपणे गाठून त्या पातळीवर आपले जीवन जगण्याची संधी ह्या परिवर्तनाने माणसाला, ह्या पृथ्वीवर त्याचा उदय झाल्यानंतर पहिल्यांदाच, प्राप्त करून दिली आहे.

२

इस्लामी परंपरेला आजवर तेरा शतकांहून अधिक काल लोटला आहे. पण ह्या परंपरेत प्रभावी ठरलेला जगाविषयीचा इस्लामी दृष्टिकोन मूलतः मानवतावादाला विरोधी आहे. जीवनाच्या ऐहिक आणि पारमार्थिक क्षेत्रांमध्ये इस्लाम काही भेद करीत नाही. किंबहुना त्या दोघांना एकजीव करण्यात, एकवटण्यात इस्लाम हिंदूधर्माच्याही पलीकडे जातो. हिंदू धर्म व्यक्तीने स्वतःच्या प्रयत्नांनी जी वैयक्तिक मुक्ती साधायची असते तिच्यावर भर देतो. ह्याच्या उलट जमात (उम्मा) हे कुराणात ईश्वराची जी उद्दिष्टे प्रकट झाली आहेत ती साधण्याचे एकमेव माध्यम आहे असे मानतो. मुस्लिम जमातीचा एक घटक, एक अवयव म्हणूनच कुणाही व्यक्तीला एक मुसलमान हे स्वरूप प्राप्त होऊ शकते. एक मुसलमान म्हणून तिचे जे अस्तित्व असते ते मुसलमान जमातीचा एक घटक म्हणूनच असते. म्हणजे 'व्यक्ती' ही संकल्पनाच किंवा 'नागरी समाज' (civil society) ही संकल्पनाच अप्रमाण म्हणून इस्लामकडून अव्हेरण्यात येते. व्यक्तीचे एक विशिष्ट धार्मिक स्वरूप अंगी असलेल्या समूहाशी (म्ह. मुस्लिम जमातीशी) जे नाते असते, त्या समूहाचा घटक असण्याचे जे नाते असते. त्या नात्यावर इस्लाम मानवी जीवनाची सर्व अर्थपूर्णता आधारतो; मानवी जीवनाला जो अर्थ प्राप्त होतो तो ह्या नात्यात सामावलेला असतो.

ईश्वराने प्रकट केलेल्या धर्मावर आधारलेल्या सर्वच संस्कृतींच्या ठिकाणी हे वैशिष्ट्य असल्यासारखे दिसते. ह्या बाबतीत ख्रिश्चन धर्म जर काहीसा वेगळा भासत असेल तर त्याच्या जवळजवळ प्रारंभापासून त्याच्यावर ग्रीक परंपरेचा प्रभाव पडला होता हे त्याचे कारण होय. युरोपमध्ये ग्रीक विद्यांचे जे पुनरुज्जीवन झाले त्याची परिणती रीनेसामध्ये आणि व्यक्तीला 'पवित्र ग्रंथा'चा अर्थ लावायचा अधिकार असतो ह्यावर भर देणाऱ्या प्रॉटेस्टंट पंथाच्या उदयामध्ये झाली. ख्रिश्चन धर्माचे हे जे 'मानवीकरण' झाले आणि त्याचा परिणाम म्हणून व्यक्तीच्या स्वरूपाविषयीच्या ऐहिक संकल्पनेचा जो विकास झाला ते ख्रिश्चन धर्माच्या ग्रीक परंपरेशी ज्या क्रिया-प्रतिक्रिया झाल्या त्यांचे साक्षात् फलित होय.[५] ह्या संदर्भात लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की 'किताबी लोकां'* प्रमाणे ईश्वराचा एक प्रेषित लाभण्याचे भाग्य ग्रीकांच्या वाट्याला आले नव्हते; किंवा हिंदूंप्रमाणे ईश्वरी अवतारही त्यांना लाभला नव्हता. ह्यामुळे विश्वाचे स्वरूप शोधून काढताना त्यांना केवळ आपली बुद्धी आणि निरीक्षणशक्ती ह्यांच्यावर विसंबून रहावे लागले. शिवाय ग्रीक लोक अनेक देवदेवता मानीत आणि ह्या देवांच्या अंगी जरी अतिमानवी शक्ती असल्या तरी त्यांच्या इच्छा–आकांक्षा 'आध्यात्मिक' नव्हत्या, त्या पूर्णपणे 'ऐहिक' होत्या. ह्यामुळे हे देव मूलतः माणसांपासून वेगळे भासत नसत. हिंदू आपले वेद नित्य आणि 'अपौरुषेय' आहेत, म्हणजे कुणाही माणसाने न रचलेले आहेत असे मानतात. ग्रीक परंपरेत ह्या

---

* ईश्वराने ज्या लोकांमध्ये आपला प्रेषित पाठवून त्याच्या द्वारा धर्मग्रंथ–ईश्वरी संदेश–प्रकट केला असे लोक; विशेषतः ज्यू आणि ख्रिस्ती. (भाषांतरकर्त्याची टीप)

५. ख्रिश्चनधर्माच्या प्रारंभीच्या वर्षात, दृढपणे प्रस्थापित असलेल्या रोमन साम्राज्यातील वितुष्टाच्या वातावरणात टिकून रहाण्यासाठी राज्यसंस्थेशी ऐहिक वृत्ती धारण करणे ख्रिश्चन धर्माच्या दृष्टीने अपरिहार्य होते. रीनेसांमध्ये काय घडले असेल तर ते हे की त्या काळी ह्या ऐहिक वृत्तीचे पुनरुज्जीवन करण्यात आले आणि तिचा विस्तार व्यक्तीपर्यंत करण्यात आला. महंमदाप्रमाणे जीझसनेही जर राज्य स्थापन केले असते तर ख्रिश्चन धर्माचा विकास कसा झाला असता हा एक कुतूहलजनक प्रश्न आहे.

बाबतीत ज्याची वेदांशी तुलना करता येईल असा कोणताही ग्रंथ नव्हता. तेव्हा हिंदूंप्रमाणे अपरिवर्तनीय अशा सत्याचे ओझे बाळगायचे ग्रीकांना कारण नव्हते, त्यापासून ते मुक्त होते. ह्यामुळे 'वस्तूंचे स्वरूप अधिकाधिक यथार्थतेने जाणून घेण्यासाठी सतत चाललेला शोध' अशी विज्ञानाची संकल्पना ते बनवू शकले. तसेच अन्वेषणाचे (inquiry) साधना उपलब्ध करून देणाऱ्या, आणि जे आढळले असेल त्याच्या प्रामाण्याचा कस घेण्यासाठी निकष उपलब्ध करून देणाऱ्या वैज्ञानिक पद्धतीचीही संकल्पना त्यांनी घडविली. चिकित्सक अन्वेषणाच्या आणि परीक्षणाच्या परंपरेचा विकास ते अशा रीतीने घडवू शकले. 'शंभर फुले उमलावी आणि शंभर पंथांनी विवाद करावे' ह्यासाठी जे सहिष्णुतेचे वातावरण आवश्यक असते ते त्यांनी निर्माण केले.

ग्रीक परंपरेचा ह्याच स्वरूपाचा परिणाम इस्लामवरही घडून आला असता. पण अल्-मामुनच्या राजवटीत (८१३–८३३) जेव्हा इस्लामचा तिच्याशी संसर्ग आला तोपर्यंत तिच्यातील चैतन्य ओसरून गेले होते आणि इस्लामचीही जडणघडण पक्की होऊन चुकली होती. ह्याहूनही महत्त्वाची गोष्ट अशी की इस्लामचा उदय ज्या समाजात झाला तो अनेक टोळ्यांच्या परस्पराशी सतत चाललेल्या झगड्यांनी शीर्णविशीर्ण झालेला समाज होता, जिला राज्यसंस्था म्हणता येईल असे त्याच्यात काही नव्हते आणि भिन्न विचारआचारांच्या व्यक्तींचा रासवटपणे छळ करायला तो मागेपुढे पहात नसे. ह्यामुळे इस्लामच्या संस्थापकाला, आपला संदेश पुरतेपणे लोकांपुढे प्रकट करण्यापूर्वीच राज्याचीही स्थापना करावी लागली. म्हणजे बळाच्या निर्णयशक्तीवर विसंबून न रहाता, अधिक प्रगत संस्कृतीच्या संसर्गाने ह्या संदेशाला अधिक प्रगल्भ स्वरूप देण्याला अवसरच नव्हता. प्रेषिताच्या मृत्यूनंतरच्या शंभर वर्षांच्या काळात, भोवतालच्या निश्चेष्ट आणि अवनत समाजांत जो झपाट्याने आणि विस्मयकारक असा विस्तार झाला त्यामुळेही इस्लामच्या विकासाला पायबंद बसला. आपला धर्म परिपूर्ण आहे, इतरांच्या धर्मांहून श्रेष्ठ आहे, त्याचे सिद्धांत प्रमादरहित (infallible) आहेत अशी जी मुसलमानांची खात्री होती ती सतत मिळणाऱ्या विजयामुळे दृढ झाली. मध्ययुगीन ख्रिश्चन समाजात पाखंडी मते जितक्या निर्घृणपणे दडपून टाकण्यात येत असत तितक्याच निर्घृणपणे ती इस्लाममध्येही दडपण्यात येत असत. ह्यामुळे सर्वोत्कृष्ट, अतिशय धैर्याचे मुस्लिम विद्वानही धार्मिक श्रद्धेने स्वीकारलेल्या मूलभूत सिद्धांतांच्या सत्यतेविषयी आपण यत्किंचितही संशय घेत आहो असे ज्याच्यामुळे वाटेल असे काहीही म्हणायचे काळजीपूर्वक टाळीत. मुताझिलाइट पंथाचे तत्त्ववेत्ते ईश्वर, आत्मा इत्यादि विषयीच्या इस्लामी सिद्धांतांचे विवरण आणि समर्थन करण्यासाठी ग्रीक संकल्पनांचा उपयोग करीत. पण 'सुन्नी मुसलमानातील बहुसंख्य' त्यांनासुद्धा "पाखंडी मानीत असत" आणि पाखंडी म्हणूनच त्यांना वागवीत असत.[६] इब्न सिना हा जे कित्येक थोडे खरोखर थोर असलेले मुस्लिम तत्त्ववेत्ते आहेत त्यांच्यातील एक आहे. पण इब्न सिना हा 'पूर्वनिश्चित तार्किक रचनेची' कल्पना करतो आणि तिची 'ईश्वराच्या शक्तीला मर्यादा घालतो' आणि 'सान्त व्यक्तीला अनन्ताविषयी जो आत्यंतिक भीतिमिश्रित पूज्यभाव वाटला पाहिजे त्याच्यात न्यून आणतो' म्हणून मुस्लिम परंपरेच्या अधिकृत भाष्यकारांनी त्याच्यावर टीका केली आहे.[७] पण एवढेच नव्हे. इब्न सिना स्वतःच आपल्या उत्तर आयुष्यात एक अतिशय भाविक, सश्रद्ध ज्ञानमार्गी (ghostic) बनला; 'ॲव्हिसेना (इब्न सिना) सारख्या व्यक्तीच्या लिखाणात ह्यासारख्या "विवेकविरोधी कल्पनांचे आणि विधानांचे" जाळे अधिका-

६. डब्ल्यू मॉंटगॉमरी वॉट, 'व्हाट इज इस्लाम ?,' लॉंगमन्स, लंडन १९६८; पृ. १६८; जी. ई. फॉन ग्र्युनेबॉम, 'मिडिइव्हल इस्लाम' (दुसरी आवृत्ती), शिकागो युनिव्हर्सिटी प्रेस, १९५३, पृ. १०२–१०५

७. सैद हुसेन नस्र, ॲन इन्ट्रोडक्शन टु इस्लामिक कॉस्मॉलॉजिकल डॉक्ट्रिन्स,' हार्वर्ड, केंब्रिज (मॅसॅ.) १९६४, पृ. २१४

धिक दाट बनत चालल्याचे जेव्हा आपल्याला आढळून येते तेव्हा आपल्याला धक्काच बसल्यासारखे होते.'[८]

एक सांस्कृतिक परंपरा म्हणून इस्लामचे हे जे अंग आहे त्याचा मी मुद्दाम काहीशा विस्ताराने परामर्श घेतला आहे. भूतकालात इस्लामची वृत्ती असहिष्णुतेची होती हे ह्याचे कारण नव्हे. इस्लामचीच केवळ असहिष्णुतेची वृत्ती होती असे नाही. इतरांचीही तशी होती. माझे कारण असे आहे की मोकळेपणे केलेल्या अन्वेषणाविषयी, विरोधी किंवा वेगळ्या मताच्या आविष्काराविषयी इस्लाम अजूनही तीच असहिष्णुतेची वृत्ती धारण करताना आढळतो. मुताझिलाइट पंथी आणि त्यांचे सनातनी विरोधक ह्यांनी परस्परांचा जो छळ चालविला होता तो ओसरल्यानंतर विज्ञान आणि तत्त्वज्ञान ह्यांचा विकास घडून येईल आणि त्यायोगे ही वृत्ती सौम्य होईल अशी काही थोडी आशा होती. पण अल्–घझालीने (मृ. १,१११) ती पुढील अनेक शतकांसाठी अतिशय यशस्वीपणे नष्ट केली. तुर्कस्तानात लादले त्याप्रमाणे जर वरून लादण्यात आले नाही तर मुस्लिम समाजामध्ये प्रबोधन घडून येणार नाही अशी निश्चिती अल्–घझालीने आपल्या कामगिरीने साधली. मुस्लिम परंपरेचे विद्वान अभ्यासक अल्–घझालीला मुस्लिम संस्कृतीने निर्माण केलेला सर्वश्रेष्ठ विचारवंत मानतात. मला असे वाटते की अल्–घझाली म्हणजे प्रेषिताच्या मृत्यूनंतर इस्लामी समाजाला भोगावी लागलेली सर्वात मोठी आपत्ती होती. (हिंदू समाजाच्या संदर्भात शंकराचार्यांचे हेच स्थान आहे.)

३

कुराणाच्या प्रकटीकरणाचा आणि इस्लामच्या प्रारंभीच्या वाढीचा काळ, आणि सध्याचा काळ ह्यांच्यांत अनेक शतकांचे अंतर असले तरी इस्लाममध्ये समजुती आणि विचाराच्या सवयी ह्यांचे एक विलक्षण सातत्य आढळून येते, ह्या बाबतीत इस्लाम आणि इतर धर्म यांच्यात भेद आहे ही गोष्ट वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. वर म्हटल्याप्रमाणे इस्लाम माणसाची स्वायत्तता आणि निर्मितिशीलता नाकारतो. बुद्धी ही माणसाच्या स्वाभाविक शक्तींपैकी एक आहे हे जरी इस्लाम मान्य करीत असला तरी बुद्धी आणि अनुभव ह्यांच्याहून श्रेष्ठ असलेली आणि स्वतःप्रमाण ज्ञानाला जन्म देणारी प्रातिभज्ञानशक्ती (intuition) अशी शक्ती आहे असे तो मानतो. उदा. अल्–घझालीच्या म्हणण्याप्रमाणे, "(वैद्यक, ज्योतिष) ह्यासारख्या शास्त्रात ज्याने संशोधन केले आहे त्याला हे अनिवार्यपणे कळून आलेले असते की ईश्वरी प्रेरणेमुळे व स्फूर्तीमुळेच आणि सर्वश्रेष्ठ जो ईश्वर त्याच्या साहाय्यामुळेच हे ज्ञान प्राप्त होऊ शकते. निरीक्षणामुळे हे ज्ञान प्राप्त होऊ शकत नाही."[९] पण एवढेच नाही. काही थोड्या निवडक व्यक्ती सोडल्या तर इतरांना गणित आणि तत्त्वज्ञान शिकवायला अल्–घझालीचा विरोध आहे. कारण ह्यामुळे त्यांची श्रद्धा कमकुवत होईल अशी त्याची भीती आहे. कारण गणित संबंधित विज्ञानांना अधिरपणे जे वाहून घेऊ पहातात त्यांना प्रतिबंध करणे योग्य ठरेल. कारण जरी त्यांच्या विषयांचा आणि धर्मांचा नजिकचा संबंध नसला, तरी हे विषय तत्त्वज्ञानात्मक शास्त्रांना पायाभूत असल्यामुळे तत्त्ववेत्यातील दुष्ट प्रवृत्ती आणि भ्रष्टता ह्यांची बाधा विद्यार्थ्याला होते."[१०]

इस्लामची परंपरा केवळ बुद्धिविरोधी आहे असे नाही; ऐहिक, लोकशाही राज्यव्यवस्थेच्या वाढीला ती प्रतिकूल आहे. उदा. नागरी समाजाच्या व्यवहाराचे नियमन करण्याचा सार्वभौम अधिकार माणसाला असतो, एखाद्या व्यक्तीला म्हणा किंवा सर्व लोकांना मिळून म्हणा, ह्या गोष्टीला इस्लाम मान्यता देत नाही. "स्वर्गावरचे, पृथ्वीवरचे आणि ह्या दोहोत जे काही असेल त्या सर्वांवरचे सार्वं-

---

८. एच्. ए. आर् गिब्ज्, सैद हुसेन नस्र (कित्ता), प्रस्तावना.

९. माँटगॉमरी वॉट (भाषां) 'फेथ अँड प्रॅक्टिस ऑफ् अल्–गझाली' जॉर्ज अॅलेन अँड अन्विन, लंडन १९५३ पृ. ६५.

१०. कित्ता ; पृ. ३४

अनुक्रमणिका

भौमत्व" ईश्वराकडे आहे; माणसाकडे नव्हे.[११] अर्थात केवळ एवढेच वचन घेतले तर त्याच्यापासून सार्वभौमत्वाची ऐहिक संकल्पना वर्ज्य आहे असे निष्पन्न होते असे मानायचे कारण नाहीं. ह्याच स्वरूपाचे सत्य बायबलमध्येही घोषित करण्यात आले आहे पण बायबल राज्यसंस्थेचे क्षेत्र आणि धर्माचे क्षेत्र ह्यांच्यात सुस्पष्टपणे भेद करते आणि ह्या सत्याच्या आशयाला महत्त्वाची मुरड घालते.[१२] धर्म सार्वभौम असला पाहिजे ही हिंदू संकल्पना अल्लाच्या सार्वभौमत्वाच्या मुस्लिम संकल्पनेशी अधिक मिळतीजुळती आहे. पण हिंदू धर्म आणि मुस्लिम धर्म यांच्यात कित्येक महत्त्वाच्या बाबतीत भेद आहे. हिंदू धर्माचा कुणी एक विशिष्ट, सर्वमान्य असा संस्थापक नाही हा इस्लाम आणि हिंदू धर्म यांमधील एक महत्त्वाचा भेद आहे. त्याचप्रमाणे विश्वाचा एक मानवसदृश असा निर्माता आहे आणि तोच विश्वाची धारणा करतो, असे हिंदू धर्म मानीत नाही. आणि शेवटचा मुद्दा असा की एकाच व्यक्तीच्या किंवा वर्गाच्या ठिकाणी ऐहिक आणि आध्यात्मिक अधिकार एकवटण्याला हिंदूधर्म धार्मिक मान्यता देत नाही. उलट इस्लाममध्ये राज्यसंस्था आणि धर्मसंस्था ह्यांच्यात भेदच करण्यात येत नाही. किंवा नागरी समाज आणि धार्मिक जमात यांच्यांत, किंवा युद्धक्षेत्रावरील नेता आणि प्रार्थनामंदिरातील नेता यांच्यात इस्लाम भेद करीत नाही. उम्मा ही ईश्वराने निवडलेल्या लोकांची एक जमात आहे आणि राज्यसंस्था हीं ह्या जमातीला ईश्वराने नेमून दिलेल्या मार्गावरून चालता यावे ह्यासाठी बनविण्यात आलेली केवळ एक रचना आहे. म्हणून खलिफा हा राजाही होता आणि 'श्रद्धाशील लोकांचा नायक'ही होता, शरिया हा ऐहिक कायदा होता आणि धार्मिक कायदाही होता.

खलिफा ईश्वराच्या नावाने राज्य करीत असल्यामुळे त्याची सत्ता अमर्यादित होती. "तो न्यायी असावा, कुराणातील नियम आणि त्यांच्यापासून निष्पन्न होणारे उपनियम ह्यांच्या अर्थाचा निर्णय करण्याचे ज्ञान त्याला असावे, त्याच्या मनाच्या सर्व शक्ती शाबूत असाव्यात आणि त्याच्या शरिराचे सर्व अवयव धडधाकट असावे, आपल्या मनाप्रमाणे वागायला तो स्वतंत्र असावा, मसलतीत तो हुषार असावा आणि त्याच्या ठिकाणी उच्च धैर्य असावे आणि शेवटी, तो योग्य जातकुळीचा, म्हणजे कुरेश टोळीचा सदस्य, असावा[१३] "अशी अपेक्षा होती." अर्थात हा एक केवळ आदर्श होता. प्रत्यक्षात पहिल्या चार खलिफानंतरचे खलिफ ह्या आदर्शाच्या मानाने कमी पडतात हे मान्य करण्यात येते. पण इस्लाम एकतंत्री जुलमी सुलतानशाही विरुद्ध केलेल्या बंडाला अनुमती देत नाही. "धर्मकोविदांच्या लिखाणावरून हे स्पष्ट होते की एका बाबतीत घक्षालीशी सहमत होते. ते यादवीपेक्षा कोणत्याही प्रकारचे स्थिर शासन, निरंकुश, जुलमी, सुलतानशाहीसुद्धा पसंत करीत; आणि सत्ताधीश कुणीही असो, सर्व प्रजेने त्याचे आज्ञापालन केले पाहिजे असा त्यांचा आदेश होता......एक हादिथ (प्रेषिताचे आलेले वचन) अशा अर्थाची आहे...'माझे (प्रेषितांचे) आज्ञापालन हे ईश्वराचे आज्ञापालन आहे आणि इमामचे (धार्मिक नेत्याचे) आज्ञापालन हे माझे आज्ञापालन आहे; तसेच माझ्याविरुद्ध केलेले बंड हे ईश्वराविरुद्ध केलेले बंड आहे आणि इमाम विरुद्ध केलेले बंड हे माझ्याविरुद्ध केलेले बंड आहे." [१४] तेव्हा फॉन ग्न्युनेबॉम म्हणतात त्याप्रमाणे "निरंकुश राजकीय सत्तेचा सिद्धांत ईश्वराची, त्याने निर्मिलेल्या जीवांवर निरंकुश सत्ता असते ह्या सिद्धांताशी समांतर आहे," हे स्पष्ट होते.[१५]

११. एम्. एम्. पिक्थाल, 'धि ग्लोरियस कोरान,' धि न्यू अमेरिकन लायब्ररी, न्यू यार्क, XLIII. ८५

१२ पहा: मॅथ्यू, २२.२१ "म्हणून ज्या गोष्टी सीझरच्या आहेत त्या सीझरला सुपूर्द करा आणि ज्या ईश्वराच्या आहेत त्या ईश्वराकडे सुपूर्द करा."

१३ अल्-मवार्दि, अल-अहकम अल्-सुलतानिया ("सुलतानाविषयीचे कायदे") पृ. ३ व पुढे, आर. लेव्ही, 'धि सोशल स्ट्रक्चर ऑफ इस्लाम,' केंब्रिज १९५७ (पुनरावृत्ती १९६५) पृ. २८५

१४. आर्. लेव्हि, कित्ता, पृ. २९१

१५. जी. ई. ग्न्युनेबॉम, ह्या निबंधाच्या प्रारंभी उद्धृत.

अनुक्रमणिका

ह्या विचारव्यवस्थेत वैयक्तिक स्वातंत्र्य आणि मानवी समता ह्याना काही स्थान असायचा प्रश्नच उद्‌भवत नाही; मग माणसाच्या नैतिक स्वायत्ततेची दखल घेण्याची गोष्ट दूरच राहिली. ईश्वराच्या इच्छेपुढे माणूस कःपदार्थ आणि सर्वतोपरी हतवल आहे ह्या गोष्टीवर कुराणात परत परत भर देण्यात आला आहे; आणि ईश्वराच्या इच्छेला कोणत्याही नियमाचे किंवा तत्त्वाचे बंधन नाही आणि म्हणून ती माणसाला अनाकलनीय आहे.[१६] समतेविषयी म्हणाल तर कुराण गुलामगिरीला अनुज्ञा देते आणि केवळ घटस्फोट आणि वारसा यांच्या बाबतीतच नव्हे तर साक्षीदार म्हणून मान्य होण्याच्या बाबतीतही स्त्रीला पुरुषापेक्षा कनिष्ठ मानते ह्या गोष्टींची दखल घेतली तर कुराणाची ह्या विषयीची शिकवण स्पष्ट होईल.[१७] उदा. II. २८२ ह्या वचनात कराराला दोन पुरुष साक्षी असावे लागतात किंवा एक पुरुष व दोन स्त्रिया साक्षी असावे लागतात. असा नियम घालून देण्यात आला आहे. ह्याच प्रकारची विषमता वारसाहक्क आणि घटस्फोटाचा हक्क ह्यांच्या बाबतीतही आहे. इस्लाम समतेचा पुरस्कार करतो अशी जी सर्वसाधारण समजूत आहे तिच्यात दोन प्रकारे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. इस्लामची समतेची संकल्पना केवळ सह–मुस्लिमांपुरती मर्यादित आहे, सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे आहेत व म्हणून समान आहेत असे ह्या संकल्पनेत अभिप्रेत नाही. दुसरी गोष्ट अशी की समतेची ही संकुचित संकल्पनासुद्धा प्रार्थनेच्या वेळेपुरती मर्यादित ठेवण्यात येते. संपत्ती, सामाजिक दर्जा, लिंग किंवा कौटुंबिक संबंध ह्यांतून जे भेद निर्माण होतात त्यांना उद्देशून हे समतेचे तत्त्व लावण्यात येत नाही. वांशिक श्रेष्ठत्वाच्या कल्पनेला इस्लाम मान्यता देत नाही ही गोष्ट खरी आहे; पण तरी सुद्धा प्रेषिताच्या मृत्यूनंतर बराच काल होईपर्यंत सुद्धा खलिफा होण्यासाठी कुरेश टोळीचा सभासद असणे ही पात्रतेची एक आवश्यक अट आहे असे मानण्यात येत असे. एवढ्या उच्च क्षेत्राचा विचार सोडून दिला आणि अधिक सामान्य माणसांकडे वळलो तरी, एखाद्या निग्रो मुस्लिमाला सामान्यपणे, आपण अरब मुस्लिमाशी समान मानले जाऊ अशी अपेक्षा बाळगता आली नसती; अर्थात् पुरेशा सत्तेचे किंवा संपत्तीचे त्याला पाठबळ असेल तर गोष्ट वेगळी.

मानवतावादी दिशेने आपली उत्क्रांती घडवून आणायला मुस्लिम समाज कायमचा असमर्थ ठरणार असा ह्या विवेचनाचा अर्थ आहे का? मला असे वाटत नाही. पण ही उत्क्रांतीची प्रक्रिया दीर्घकाल चालणारी आणि बिकट अशी ठरेल यात शंका नाही. आधुनिक मानवतावादी मूल्ये आणि दृष्टिकोन ह्यांच्याशी सुसंवाद साधेल अशा रीतीने इस्लामच्या शिकवणीचे नवीन, सर्जनशील निरूपण करण्याचे ठरविले तर विशेषतः प्रेषिताच्या संदेशात आणि सुन्नामध्ये ह्यासाठी पुरेशी सामग्री आहे असे आढळून येईल.

उदा. बहुपत्निकत्वाविषयी कुराणात जी विधाने करण्यात आली आहेत ती मुसलमानांनी जर त्यांच्या ऐतिहासिक संदर्भात[१८] घेतली तर आज बहुपत्नि-

---

१६. उदा. पहा एम्. एम्. पिक्थाल, कित्ता III. २६ "तुला पाहिजे असेल त्या कुणालाही तू सार्वभौम सत्ता बहाल करतोस व तुझ्या इच्छेप्रमाणे तू कुणाचीही सार्वभौम सत्ता काढून घेतोस. तुझ्या इच्छेप्रमाणे तू कुणालाही उच्चपदी स्थापन करतोस आणि तुला पाहिजे असेल त्याप्रमाणे तू कुणालाही हीनपण देतोस. कल्याण तुझ्या हातात आहे. पहा! तू सर्व काही करायला समर्थ आहेस."

१७. उदा. पहा. कित्ता, XVI 75: 'अल्लाने हे साम्य बनविले आहे: (एकापक्षी) ज्याचा कशावरही अधिकार नसतो असा (कुणाची तरी केवळ) मालमत्ता असलेला गुलाम, आणि (दुसऱ्या पक्षी) आम्ही ज्याला नीट सामग्री उपयोगाकरिता दिली आहे आणि जो गुप्तपणे किंवा उघड रीतीने तिचा खर्च करतो तो होय. हे दोन्ही समान आहेत काय?"

१८. एम्. एम्. पिक्थल, कित्ता. IV 2–3 "पोरक्या मुलांना त्यांची संपत्ती द्या...... आणि आपण त्यांच्याशी रास्तपणे वागू शकणार नाही अशी भीती जर तुम्हाला वाटत असेल तर, तुम्हाला ज्या स्त्रिया चांगल्या वाटतील त्यांच्याशी, दोघांशी, तिघांशी, चौघांशी लग्न करा. पण (इतक्या

कत्वाच्या प्रथेवर कायदेशीर बंधन घातल्याने त्यांच्या धर्मात हस्तक्षेप तर होणार नाहीच, उलट ह्या विधानात जी वृत्ती प्रकट झाली आहे तीच वृत्ती अशा बंदीतून व्यक्त होईल असे त्यांना आढळून येईल. ह्या विधानांविषयी थोडासुद्धा विचार केला तर पुढील गोष्टी स्पष्ट होतात: (१) ही विधाने मुभा देणारी आहेत, आदेश देणारी नाहीत; (२) युद्धात कामी आलेल्या पुरुषांची मुले आणि विधवा यांची जी दुर्दशा होते ती पाहून अंतःकरणाला आलेल्या कळवळ्यामुळे प्रेषिताने ती केली आहेत; (इस्लामपूर्व काळात अरब अशा विधवांना मालकीच्या वस्तू म्हणून वागवीत आणि त्यांना सक्तीने देहविक्रय करून पैसे मिळवायला भाग पाडीत); आणि (३) पहिली बायको हयात असताना जर एखाद्या मुसलमानाला परत लग्न करायचे असेल तर (प्रेषिताने आयेशा हिच्याशी लग्न केले असले तरीही) त्याने विधवेशी लग्न केले पाहिजे, कुमारिकेशी नव्हे. प्रेषिताने ज्या प्रकारच्या बहुपत्निकत्वाच्या पद्धतीला अनुज्ञा दिली तिचे स्वरूप आणि तिच्या मागचा हेतू ध्यानात घतला तर ती पद्धत आज मुसलमान आपला धार्मिक अधिकार म्हणून ज्या प्रकारच्या बहुपत्निकत्वाच्या हक्कासाठी आग्रह धरतात त्याच्याहून पूर्णपणे भिन्न आहे यात शंका नाही. आणि कुराणामध्ये मुस्लिम वैयक्तिक कायद्याविषयी करण्यात आलेल्या प्रत्येक विधानाकडे– उदा. घटस्फोट किंवा वारसा ।विषयीच्या विधानांकडे– ह्या दृष्टीने पहाता येईल. म्हणजे माणसांच्या कल्याणाविषयीच्या ज्या आस्थेने प्रेरित होऊन प्रेषिताने कुरेशी टोळीला लाभणाऱ्या विशेषाधिकारांकडे पाठ फिरवली, त्याऐवजी छळणूक आणि देशत्याग सहन करावा लागला तरी त्याचे स्वागत केले, जिवाला धोका निर्माण झाला तरी त्याची तमा बाळगली नाही ती आस्थाच ह्या वचनांच्या मागे आहे असे दाखवून देता येईल.

शिवाय नवीन ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या प्रकाशात कुराणातील वचनांचा नवीन अर्थ लावायला अनुकूल असलेली अशी प्रेषिताची एक प्रसिद्ध हदिस आहे. ऐहिक व्यवहाराच्या क्षेत्रात मी केवळ एक माणूस आहे हे ध्यानात धरा असे प्रेषिताने आपल्या अनुयायांना सांगितल्याची एक कथा आहे– ह्याचा अर्थ असा की ऐहिक व्यवहाराच्या क्षेत्रात इतर कुणाही माणसाइतका त्यांचा निर्णयही स्खलनशील ठरणे शक्य होते. अर्थात् सनातनी मुसलमान ज्या गोष्टींबाबत कुराणात स्पष्टपणे विधाने करण्यात आली आहेत त्या सर्व गोष्टी ऐहिक व्यवहाराच्या क्षेत्रातून वगळतील यात शंका नाही. पण ह्याचा अर्थ असा होईल की ते दुटप्पीपणे दुहेरी मानदंडाचा वापर करतात; म्हणजे त्यांची भूमिका अधिकच कमकुवत ठरेल. कारण कुराणाने अनेक बायका करण्याची परवानगी दिली असल्यामुळे बहुपत्निकत्वाच्या प्रथेवर बंदी घालायला जेव्हा ते विरोध करतात तेव्हा कुराणाने अनुज्ञा दिलेली कोणत्याही गोष्टीवर बंदी घालायचा अधिकार राज्यसत्तेला नसतो ही भूमिका त्याच्यात अभिप्रेत आहे. पण ह्याच न्यायाने स्त्रियांना गुलाम म्हणून बाळगण्यावर जी बंदी घालण्यात आली आहे तिलाही त्यांनी विरोध केला पाहिजे; कारण कुराणातील ज्या वचनांनी बहुपत्निकत्वाला अनुज्ञा दिली आहे त्याच वचनांनी युद्धात पकडण्यात आलेल्या स्त्रियांशी लैंगिक संबंध ठेवायलाही मुसलमानांना परवानगी दिली आहे.

पण एवढेच नाही. गुन्हेगारांना कित्येक पाशवी शिक्षा देण्याचा कुराणाने आदेश दिला आहे. प्रामुख्याने मुस्लिम असलेल्या देशांतही ह्या शिक्षा आता प्रचलित नाहीत. उदा. व्यभिचाराचा अपराध केलेल्या स्त्रीला किंवा पुरुषाला शंभर फटक्यांची शिक्षा दिली पाहिजे असे कुराणात सांगितले आहे; आणि "त्या दोघांना शिक्षा दिली पाहिजे ह्यावर जर तुमचा विश्वास असेल तर त्यांच्याविषयी वाटणाऱ्या दयेमुळे अल्लाचे आज्ञापालन करण्या-

---

सर्वांना) आपण न्याय देऊ शकणार नाही अशी भीती तुम्हाला असेल तर (केवळ) एकीशीच करा; नाहीतरी तुमच्या उजव्या हातात असलेल्या (म्ह. तुमच्या मालकीच्या बंदिवान स्त्रिया) आहेतच. अशा रीतीने तुमच्या हातून अन्याय घडण्याची शक्यता कमी होईल.

अनुक्रमणिका

पासून तुम्ही परावृत्त होऊ नका." [१९] तसेच शरियतच्या पुराव्याविषयीच्या कायद्याप्रमाणे कराराचे साक्षी म्हणून दोन पुरुष किंवा एक पुरुष व दोन स्त्रिया आवश्यक असतात.[२०] स्त्रियांविरुद्ध ह्या भेदभाव करूनसुद्धा परत बेदावीच्या म्हणण्याप्रमाणे फक्त दिवाणी खटल्यांमध्ये स्त्रिया साक्षिदार म्हणून मान्य होण्यासारख्या असतात.[२१] पण कुणीही समंजस मुसलमान, मग तो कितीही सनातनी असला तरी कुराणाचे हे सारे म्हणणे आज अंमलात आणावे अशी मागणी करणार नाही. आता ह्या प्रश्नाविषयीची ही त्याची वृत्ती ध्यानात घेतली तर तिचा फक्त दोन प्रकारे अर्थ लावता येईल आणि ह्या दोन अर्थातून कोणत्यातरी एका अर्थाची निवड करावी लागेल. एक अर्थ असा होईल की कुराणाने अगदी सुस्पष्टपणे दिलेल्या आदेशांशी कित्येक बाबतीत मूलतः विरोधी असलेल्या अशा दिवाणी आणि फौजदारी कायद्याखाली तो रहात असल्यामुळे तो आता मुसलमान उरलेला नाही. किंवा त्याचा दुसरा अर्थ असा होईल की ज्या जगात तो जगतो आहे त्याच्याशी जुळवून घ्यायला स्वेच्छेने म्हणा किंवा अनिच्छेने म्हणा तो तयार आहे. पण कोणताही अर्थ घेतला तरी कुराणाच्या सुस्पष्ट आदेशांपासून तो ढळला आहे; आणि तसूभर ढळला आहे की योजनभर ढळला आहे ह्याला काही महत्व नाही.

मग श्रद्धेने स्वीकारलेल्या धार्मिक सिद्धांतांना आणि संस्थांना मानवतावादी स्वरूप द्यायला सुशिक्षित मुसलमान विरोध का करतात? जे सुशिक्षित मुसलमान जाणीवपूर्वक दुटप्पी खेळ खेळण्यात गुंतले आहेत म्हणजे जे बाहेर आधुनिकतेची भाषा बोलतात आणि घरी सनातनी, भाविक भाषा बोलतात त्यांचा विचार येथे करण्याचे कारण नाही. पण जे असे समजून उमजून दुटप्पीपणे जगत नसतात त्यांना एकतर आपल्या जमातीच्या क्रोधाची दहशत वाटत असते किंवा त्यांना आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेची भीती वाटत असते. ह्या प्रक्रियेमुळे हिंदू आणि मुसलमान, ख्रिश्चन आणि ज्यू यांना समान असलेली मानवता पुढे येईल आणि मुसलमान ही आपली अस्मिता आपण गमावून बसू अशी ही भीती आहे. पहिल्या गटातील मंडळींना वाटत असलेली भीती अतिरंजित आहे हे उघड आहे आणि समान विचारांच्या व्यक्तींनी एकत्र येऊन धैर्याने मुकाबला करण्याने तिच्यावर काबू मिळविता येईल. दुसऱ्या गटाच्या दृष्टीने पहाता धर्माचे स्वरूप, मानवी संस्कृतीत धर्माने वठविलेली भूमिका आणि व्यक्तीच्या अस्मितेत धर्माचे योग्य स्थान ह्या गोष्टींची मूलगामी चिकित्सा आवश्यक ठरते. ही चिकित्सा येथे करता येणार नाही. पण एका गोष्टीकडे लक्ष वेधण्यासारखे आहे. अशी चिकित्सा शक्य व्हायची तर त्यापूर्वी, इतर मानवी संस्थांप्रमाणे धर्मामध्येही सार्वत्रिक, सार्वकालिक महत्वाच्या घटकांबरोबर कित्येक केवळ ऐतिहासिक स्वरूपाचे घटकही अंतर्भूत असतात ह्याची जाणीव पुरेशा मुसलमानांना झालेली असणे आवश्यक आहे. प्रत्येक युगाला, आपल्याला लाभलेल्या वारशाचे नव्याने मूल्यमापन करून त्याच्यातील कोणत्या गोष्टी आपल्या गरजांशी संबंधित आहेत आणि कोणत्या गतार्थ झाल्या आहेत, हे ठरवावे लागते. इस्लामच्या सांस्कृतिक वारशाच्या अशा मूल्यमापनाला जेव्हा प्रारंभ होईल तेव्हा ते मुस्लिम समाजाच्या मानवतावादी प्रबोधनाचे प्रसादचिन्ह ठरेल. अ-मुस्लिम परिसराच्या प्रभावामुळे असे प्रबोधन आज भारतात घडून येत आहे ह्याच्या खाणाखुणा दिसत आहेत. पण हे प्रबोधन पुरेसे लवकर घडून येईल का, हिंदू आणि मुसलमान यांच्यांत आपल्या पारंपरिक भूमिकांना चिकटून राहून परस्परासमोर ठाण मांडून रहायची जी वाढती प्रवृत्ती आज दिसून येत आहे ती उलटवायची तर हे प्रबोधन जितक्या लवकर घडून आले पाहिजे तितक्या लवकर ते घडून येईल का हा खरा प्रश्न आहे.

---

१९. एम्. एम् पिक्थाल, कित्ता, XXIV. २

२०. कित्ता, II. २८२

२१. आर् लेव्ही, कित्ता. पृ. ३४४

अनुक्रमणिका